

# प.पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचा पत्रसंग्रह (भाग - २)

# आणि

# प.पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांची प्रश्नोत्तररत्न मालिका

प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचा

'पत्रसंग्रह' (भाग २)

आणि

प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांची

'प्रश्नोत्तर रत्नमालिका'

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्रकाशन
श्रीगणेश चतुर्थी, श्रीपाद श्रीवल्लभ जयंती (शके १९३१)
रविवार, दि. २३ ऑगस्ट २००९

मुखपृष्ठ
सुरेंद्र शिंदे

मुद्रक
रमा एन्टरप्राईझेस
३९, स्वामी समर्थ नगर,
बंडू गोखले पथ, गिरगांव, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : २३८५ २८४६
भ्रमणध्वनी : ९३२३२९१०३४

प्रकाशक
श्री दत्त आश्रम संस्थान
प. पू. श्री दत्त महाराज कवीश्वर मार्ग,
सद्गुरु नगर, प्रशांती नगर समोर,
जालना – ४३१ २०३.
दूरध्वनी : ०२४८२ २३६८०५

॥ श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नम: ॥

# भूमिका

प. पू. श्रीदत्तमहाराज स्वरुपाशी तादात्म्य न मोडता व्यवहारात होते. सगुण-साकार रुपातील मर्यादा, परिमितता ते न चुकता पाळत ही त्यांची धर्मसूक्ष्मता होती. ह्याचे प्रत्यंतर पत्रसंग्रहाच्या दुसऱ्या भागात, प.पू.महाराजांनी मांडलेल्या विचारातून दिसून येते. ईश्वरप्रार्थना करणं, ईश्वरस्मरणपूर्वक कर्म करणं व ते ईश्वरचरणी वाहून टाकणं, हा महत्त्वाचा सिद्धांत यातून सतत मांडला आहे. यांतील औपचारिक मायने व वाक्ये टाळून फक्त उपदेशावर जास्त भर देण्यात आला आहे.

या पुस्तकातील दुसरा भाग आहे, ''प. पू. श्रीदत्तमहाराजांची प्रश्नोत्तररत्नमालिका'' सर्वसामान्य वाचकाला समजतील अशा तऱ्हेने प्रश्न उपस्थित करुन त्याची उत्तरे प. पू. महाराजांच्या प्रवचनातून घेतलेली आहेत. वरकरणी वाक्य लहान पण त्यातील आशय फार मोठा आहे. सत्त्वप्रधान वाक्यं असल्याने शब्दातून निर्माण होणारी उर्जा आपल्या मनावर सात्त्विकतेचा प्रभाव गाजवते. ब्रह्मश्री पू. महाराजांनी केलेले हे चिंतन आहे, असे लक्षात घेऊन ह्याचे मनन झाले तर, 'क्रिया पालटे रोकडी । तो सत्त्वगुण' या समर्थोक्तीचा अनुभव आल्याशिवाय राहणार नाही.

**॥ अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ॥**

॥ श्री गणेशदत्त गुरुभ्यो नमः॥

१. इष्टदेवतेची प्रार्थना, नामस्मरण श्रद्धेने नित्य चालू ठेवावे. ईश्वरकृपेने सर्व कल्याण होईल. संतांचे ग्रंथ सवडीने रोज वाचावेत यानेही उत्तम मार्गदर्शन होत राहील.

२. नूतन वास्तुशांतीनिमित्त श्रींचे आशीर्वाद पत्र
''वास्तुपुरुषरूप परमेश्वराच्या'' कृपेने आपल्या नवीन वास्तुत पुण्यकर्मे नित्य घडत राहून आपले सहकुटुंब सपरिवार कल्याण व्हावे अशी श्री हरीजवळ प्रार्थना आहे.

३. धर्मशास्त्राप्रमाणे आधिक्य हा दोष नाही. न्यूनता हा दोष आहे. सर्वांबरोबर ममता बाळगून प्रामुख्याने कार्य करणाऱ्या माणसाला नेहमीच अनुकूलता लाभते असे नाही. प्रतिकूलताही पुष्कळ असते. 'सुख पाहता जवापाडे। दुःख पर्वताएवढे।' असा संताचा विचाराअंती अनुभव आहे आणि ही प्रतिकूलता, 'हेचि थोर भक्ति आवडते देवा संकल्पावी माया संसाराची' या अभ्यासाला पोषकच ठरते ही ईश्वरकृपाच आहे, उलट अनुकूलताच नेहमी येत राहिल्यास अहंकार, क्रोध इत्यादी विकार वाढण्याचा संभव असतो.

४. सकल तीर्थांचि ये धुरे। जिये का मातापितरे।
तया सेवेसी कीर शरीरे। लोण कीजे॥
ही श्री ज्ञानराजांनी सांगितलेली श्रद्धा असल्यास श्री पांडुरंग प्रपंच परमार्थ सर्व सांभाळण्यास पूर्ण समर्थ आहे.

५. ईश्वराची प्रार्थना, दिगंबरा... या मंत्राचा जप २–३ माळा सवडीने नित्य चालू ठेवावा. ईशकृपेने प्रतिकूल प्रारब्ध संपून जाईल, अनुकूलता लाभेल. काळजीचे कारण नाही. संसारी कोणत्याही माणसाला संसारात चढ उतार असणारच. ईश्वर स्मरणाने शांती लाभ करून घ्यावयाचा असतो. दोघांही पती–पत्नींनी एकमेकांशी एकनिष्ठ प्रेमाने राहून संत महात्म्यांचे प्रमाणे वागण्याचा प्रयत्न केला म्हणजे संसार सुखाचा होतो. श्री एकनाथ महाराजांचे भावार्थरामायण रोज सवडीने वाचावे याने पुष्कळ समाधान लाभेल. देवांची संतांची चरित्रे वाचून त्यांचे चिंतनानेही निराशा जाऊन चित्त प्रसन्न राहते. तुमचे मातापिता देवगुरुभक्त आहेत. तो वारसा तुमच्याकडेही आला आहे हा निश्चय बाळगून शांत चित्ताने ईश्वर चिंतन करीत असावे म्हणजे सर्व दुरितक्षय होऊन संकट परिहारही ईश्वर कृपेने होतो.

६. ईश्वर प्रार्थना नित्य करीत राहून शांत चित्ताने प्राप्त कर्तव्य करीत असावे. ईश्वर कृपेने कल्याण होईल.

७. दिगंबरा... या महामंत्राचा जप रोज सवडीने होईल तेवढा करावा ईश्वरकृपेने सर्व कल्याण होईल काळजीचे कारण नाही. देवावर भार घालून प्रार्थना जप करीत असावे उगीच भीती बाळगून विचार करीत राहू नये. पत्र म्हणजे अर्धी भेटच आहे.

८. आपली तळमळ पारमार्थिक दृष्टीने उत्तम आहे. परंतु 'तुका म्हणे तेथे न चाले तातडी। प्राप्तकाळ घडी आल्याविण' हे मान्य करावे लागते. तोपर्यंत संतांनी सांगितल्याप्रमाणे साधनांचा अभ्यास ईश्वर प्रार्थनापूर्वक करीत राहणे इतकेच साधकाचे कर्तव्य आहे. श्री प.प. श्री टेंबे स्वामी महाराजांनी देवाजवळ सात साधनांची प्रार्थना केली आहे. ''धर्मे प्रीतिम्... नमस्ते'' हे पाचश्लोकी स्तोत्र प्रसिद्ध आहे. १) धर्मे प्रीतिम्, २) सन्मति, ३) भक्ती, ४) सत्संग, ५) भुक्ती – संसार, ६) मोक्ष, ७) परमेश्वराबद्दल वाढते प्रेम. या सात साधनांची मागणी देवाजवळ नित्य करावी व याचा अभ्यास जीवनात नित्य ठेवावा. हा होण्याकरीता ईश्वराची प्रार्थना नित्य चालू ठेवावी. त्याचे कृपेने हे सर्व साध्य होऊन चित्ताला पूर्ण शांती मिळते यापेक्षा अधिक काही मागण्याचे अथवा इच्छिण्याचे कारण नाही. यात सर्व आले आहे. ईश्वर स्मरणपूर्वक आपण आपले कर्तव्य करीत रहावे. हा कर्मयोग व मनातील भक्तियोग आपणास चित्तशांतीदायक ठरतील.

९. रोज नियमाने श्रीगुरु स्मरणपूर्वक बैठकीचा अभ्यास चालू ठेवावा. मन अस्वस्थ वाटल्यास आपण रोज म्हणतात ती स्तोत्रे शांतपणे सावकाश म्हणावीत. इष्ट देवतेचे नामस्मरण करीत रहावे. म्हणजे तिकडे चित्त लागून एकाग्रता लाभेल. देवाची प्रार्थना याबद्दल नित्य करावी. ईश कृपेनेच इष्ट

कार्यसिद्धी घडून येते असा विश्वास दृढ असावा.

१०. श्री गुरु कृपेने आपला साधनाभ्यास सुरू झाला तो नियमित चालू ठेवावा. 'भूतप्रेतपिशाचाद्या....' हे स्तोत्र रोज सकाळी व संध्याकाळी श्रद्धेने म्हणावे याने चित्त शांत होईल.

११. न्यायाने धनार्जन करणे, आध्यात्मिक संतांच्या ग्रंथांचे वाचन करणे, योग्य अतिथी सज्जनाविषयी प्रेमादर बाळगणे, सत्य भाषणशील असणे, भगवन्नामस्मरण प्रार्थना करणे ही साधना इहपर कल्याण करणारी आहेत. अनुकूलतेप्रमाणे प्रतिकूलताही काही काळ संसारात उद्‌भवते, संसार द्वंद्वात्मक आहे पण तीही दूर होते. ईशभक्तिभावाने अनुत्साह निराशा दूर सारून प्राप्त कर्तव्य भगवत्स्मरणपूर्वक करीत रहावे.

१२. ईश्वर स्मरणपूर्वक प्रार्थना करून प्रयत्नाने अनुकूलता झाल्यास ती ईश्वरेच्छा समजण्यास हरकत नाही. यामुळे निरभिमानता राहून 'कोणाही जीवाचा न घडो मत्सर वर्म हे सर्वेश्वर पूजनाचे' ही ईश्वरपूजाही साधते. रागद्वेषादिविकाराधीन होऊन कोणताही प्रयत्न नसावा. कर्ता करविता परमात्माच आहे. आपण केवळ निमित्तमात्र आहोत या बुद्धीने प्रयत्नशील राहिल्यास कदाचित यश न मिळाले तरी चित्ताची समाहित अवस्था कायम राहू शकते हा मोठा लाभ आहे. संतांचे ग्रंथ सवडीने पहात असावे. सर्व खुलासा ईशकृपेने होईल. कळावे.

१३. ईश्वराची प्रार्थना व दृढनिश्चयाने अभ्यास करून आपली ध्येयसिद्धी करून घ्यावी. 'निश्चयाचे बळ तुका म्हणे तेचि फळ' हे वचन यथार्थ आहे. 'यत्न तो देव जाणावा' असे श्री समर्थही सांगतात. 'दिगंबरा.....' या महामंत्राचा जप, इष्ट देवतेचे नामस्मरण सवडीप्रमाणे चालू करावे. याने चित्तस्थैर्य लाभेल.

१४. ईश्वर स्मरणपूर्वक कायावाचामनाने शुद्ध राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे. परेच्छाप्रारब्धानुसार घडणाऱ्या गोष्टींना इलाज नाही. त्याबद्दल पश्चात्तापपूर्वक ईशप्रार्थना हाच परिहार आहे. ईश्वर प्रार्थना तळमळीने झाल्यास सर्व अनुकूलता ईशकृपेने घडून येते. प्रपंचामध्ये संसारी गृहस्थाला आवश्यक तो धनसंग्रहही करणे प्राप्त आहे. त्यातूनच यथाशक्ती सत्कर्माकरीता त्याग करीत राहून शुद्ध व्हावे लागते. परमात्मा सर्व सांभाळून कृपा करणारा आहे.

१५. प्रकृती स्वास्थ्य नसेल तर श्रवण निश्चिंतपणे घडणार नाही आणि दुसरी एक ईशेच्छेने यात अनुकूलता अशी आहे की तिथे राहूनच मागे लिहिलेला भागवतार्थ वहीमध्ये पाहता येईल आणि तेथे राहून इकडील सप्ताह स्थानाकडे लक्ष राहिल. सप्ताहस्थानात उपस्थित शरीराने राहून घराकडे चित्त जाण्यापेक्षा घरात राहून आश्रमाकडे लक्ष राहाणे केव्हाही श्रेष्ठ होईल. तरी झाले हे योग्यच झाले. ही

ईश्वरकृपाच आहे असे समजून शांतपणे भगवत्स्मरण करीत असावे.

चि... स्थळाबद्दल... कडून निरोप आला नाही. कदाचित त्यांचा विचार चालू असेल. ब्रह्मसूत्र जसे ठरले असेल तसे होईल. त्याबद्दल चिंता करण्याचे कारण नाही. परवा बार्शीस असताना एकादशीला आम्ही श्री. वेदमूर्ती वासुदेवराव तांबडे यांच्या घरी फराळास गेलो होतो. त्यावेळी त्यांनी त्यांच्या एका मुलाच्या लग्नाची गोष्ट सांगितली ती अशी – हैद्राबादच्या एका पालकांनी आपल्या मुलीची पत्रिका आमच्या मुलाकरीता पाठविली होती. पण इतर कार्याचे गडबडीत त्यांना उत्तर पाठविणे राहिले. त्यानंतर एक वर्षाचा काल गेला नंतर एक दिवस पोथी सोडून बसलो असता, ती हैद्राबादची पत्रिका दृष्टीस पडली व सर्वांचे आग्रहाने ती पत्रिका आमचे मुलाचे पत्रिकेस जमत असल्याने हैद्राबादी कळविले. ते पत्र पोचताच ती मंडळी लगेच आली व लग्न ठरून ते पार पडले. असे श्री. तांबडेबुवांनी सांगितले. 'तरी संसाराबद्दल उगीच चिंता न करता सर्वांचे कल्याण करण्याबद्दल ईश्वराची प्रार्थना करीत निश्चिंत राहणेच श्रेयस्कर आहे. सौ....... असेच वागतात त्यामुळे त्यांना शांती लाभते. भगवंत नामस्मरणाकडे लक्ष द्यावे.

१६. लोकांकडून होणारा त्रास आपल्या पूर्व दुरितांमुळेच होत

असतो. तो जाण्याकरीता वरीलप्रमाणे ईश्वरी उपासना चालू ठेवावी. उपासना 'दिगंबरा.....' जप रोज ५ ते १० माळा करणे. नोकरी मुद्दाम सोडून देण्यापेक्षा तितिक्षा, ईशस्मरण, व्यवहारचातुर्य या गुणांचा अवलंब करून हा ही काल संपवावा. चांगलाही काळ येईलच विचार करावा.

१७. आपणास ईश्वरकृपेने प्रथम क्रमांकात उत्तीर्णतेचे यश मिळाले याबद्दल धन्यवाद.

पुढील संपूर्ण जीवन साफल्याकरीता व्यवहारदृष्टीने अभ्यासाकडे लक्ष देण्याची दक्षता असावी. अनेक साधक बाधक विचारांनी या वयात अथवा केव्हाही मनाची अशांती, अस्थिरता अधिक प्रमाणात वाढत असते. अशावेळी हितैषी आप्तसज्जनांचा सल्ला आणि श्रद्धेने ईश्वरप्रार्थना या उपायांनी तो प्रतिबंध दूर करता येतो.

रात्र संपायची आली की दिवस उगवेपर्यंत वाट पहावी लागतेच. रात्रीचे समयीही वाचनाने समजणारे सद्विचार चिंतनात आल्यास रात्रही उद्वेगजनक वाटत नाही. 'चांगले ग्रंथ वाचनात ठेवावे.' सवडीने सर्व करावे. मराठी, हिंदी, इंग्रजी तीनही भाषेचा तुमचा अभ्यास आहे. ईश्वरकृपेने सर्व व्यवस्थित होईल काळजी नसावी. चांगले विचारधन संतांचे ग्रंथ सवडीप्रमाणे वाचनांत ठेवून मिळविता येईल. ईश्वर कृपा करील काळजी नसावी.

१८. गायत्री जपाने पापक्षय, बुद्धिशुद्धी, बुद्धिविकास इत्यादी सर्व इष्टसिद्धीस याचा उपयोग होणारा आहे. परमात्मा बुद्धिप्रेरक, फलदत्तः समर्थ आहे.

१९. तरी 'मनी धरावे ते होते' हे तर खरेच पण मनी धरावेही न लागता होते असाही अनुभव सद्‌भक्तांना येतो.

२०. काम करणाऱ्याने दक्षतेने, आत्मियता ठेवून प्रामाणिकपणाने काम करावयाचे असते. तसे घडत असल्यावर ईश्वराची सुद्धा अनुकूलता लाभत असल्याने भीतीचे कारण काय? कामावर नेमणाऱ्यांचे कर्तव्य, नियम्यवर्गास योग्य मार्गदर्शन वेळोवेळी करीत राहून इष्ट ते काम करवून घेणेचे आहे. तसेच दायित्व त्यांचेकडून घडत नसल्यास नियम्याने नियामकांचे कामावर, आपले काम दाखवून त्यात काय सुधारणा हवी याचे मार्गदर्शन आत्मियता, विश्वास व्यक्त करून मिळविले पाहिजे. यानेही उगीच वाटणाऱ्या अस्वस्थतेचे व भीतीचे निवारण ईशकृपेने आपोआप होईल इत्यादी विचार करून आपले काम व्यवस्थित सांभाळण्याची जबाबदारी पार पाडली म्हणजे झाले.

२१. प्रकृतीची उपेक्षा करू नये. चांगले औषध शक्तीवर्धक सुरू करावे म्हणजे बरे वाटेल. बरेच दिवस पडून राहिलेले भांडे स्वच्छ होण्यास वेळ लागतोच. वारंवार चिंच लावून ते घासावे लागते तसे मनाचे आहे. ईश्वर नामस्मरणाने ते शुद्ध

बनते. श्री धर्मराजांनी आरंभी जरी 'संन्यासे सर्वथा सुखम्' असे मानले तरी श्री भीष्माचार्यांच्या उपदेशाचा पूर्ण विचार करून श्रीकृष्णांचे आज्ञापालन करीत राहून शेवटी काही काळ राज्य केलेच. श्रीकृष्ण निजधामाला गेल्याचे समजताच लगेच महाप्रयाण केले. म्हणजे ही तयारी त्यांनी पूर्णपणे गृहस्थाश्रमांत राहूनच केली होती असे मानावे लागते. इतर आश्रमांत सद्विचार वाढविण्यास वेळ मिळेल असे आता वाटले तरी पूर्वीचे संस्कार कसे किती प्रबल आहे हे न कळल्यामुळे त्यांचा प्रतिबंध होणेचा संभव नाकारता येणार नाही. अंधार असताना काटा, विंचू, सर्प काही नाही अशी कल्पना करून तसेच जाण्यापेक्षा बॅटरी हातात असणे बरे.

२२. स्त्रिया पुरुषांपेक्षा अधिक सेवाव्रती असतात. मुलगी, पत्नी, किंवा सून, माता अशी तीनही भूमिका कर्तव्यपालनानेच पुण्य देण्याऱ्या आहेत.

२३. प्रयत्न करीत राहिले पाहिजे. विचारापेक्षा आचार प्रधान आहे. विचाराचे पर्यवसान आचारात झाले पाहिजे तरच त्याचे साफल्य आहे. ईश्वर सुद्धा योग्य आचार ठेवणाऱ्यालाच फल देणारा आहे असे नसेल तर त्याला हुकूमशहा म्हणतील. सौ. ताई महाराजांचे मार्गदर्शनाप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करावा. ईश्वराचेच सर्व कर्तृत्व आहे असा सिद्धांत अर्जुनाला सांगितला गेला तो कर्म सोडण्याकरीता नसून ईश्वर शक्तीवर

पूर्ण विश्वास ठेवून निरहंकार बनून कर्म करीत राहणे यात आपण केवळ निमित्तमात्र आहोत अशी वृत्ती बाळगून कर्म करण्याकरताच आहे. यात निराशाही नाही आणि अहंकारामुळे अति उत्साहही नाही. चित्ताची समता व निर्विकारताच आहे. स्वतःचेच विचाराधिक्य असण्यापेक्षा संतांचे विचारच मार्गदर्शक उत्साहवर्धक, निराशा दूर करणारे ठरतील असे वाटते.

२४. मन, वाणी, परमेश्वराकरीताच असली पाहिजे. श्री ज्ञानराजही

देवद्विजगुरूप्राज्ञपूजनं शौचमार्जनम् ।
ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरं तप उच्यते ॥ १७.१७

या श्लोकातील गुरु शब्दाची व्याख्या करताना सांगतात.

सकळ तीर्थाचिये धुरे, जिये का मातापितरे।
तया सेवेसी कीर शरीरे। लोण कीजे॥

या तपामुळेच पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आले असे श्री नामदेवही सांगतात. इकडे लक्ष ठेवून कृतज्ञत्व, संयम साधना हीच, 'जाणोनि करावी। चित्तशुद्धी' खरी चित्त शुद्धी होऊ शकेल.

२५. याज्ञिकी करणाऱ्या गुरुजींचे कर्तव्य शांतचित्ताने यजमानाचे कल्याणाबद्दल ईश्वर प्रार्थना करून यथाविधी त्यांचेकडून कर्म करविणे एवढेच गुरुजींचे कर्तव्य आहे. शक्य तितकी आहार, विहार शुचिता ठेवणेही हितावह आहे. 'आहारशुद्धौ

सत्त्वशुद्धिः' स्वतःची धर्मकृत्ये नैवेद्य, वैश्वदेव घरीच करून गायत्री जपाने परिग्रह दोष घालवावा. असे वागणाऱ्याच्या बाबतीत ईशकृपेने 'धर्मो रक्षति रक्षितः' वचन यथार्थ होते.

२६. आमची प्रकृती दोन महिने झाले बरी नाही. अन्नद्वेष आहे. यामुळे अशक्तपणा वाढत आहे. मंत्रप्रयोग झाला असे कोणी म्हणतात पण त्यालाही आमचे प्रारब्धच कारण आहे. ईश्वराची इच्छा ! पू. गुळवणी महाराजांना सोलापूरच्या एका ज्योतिषांनी सांगितले होते की ८८ व्या वर्षी गंडांतर आहे ते चुकेल तर ९२ वर्षपर्यंत आयुष्य आहे. पण ८८ व्या वर्षी आजारी असताना ते म्हणाले हेच वर्ष आहे ९२ नाही तसे आमचे कोणते आहे कळत नाही. ईशेच्छेप्रमाणे सर्व घडेल.

२७. मनुष्य जन्मात वंशपरंपरा प्राप्त कुळधर्म कुलाचार सांभाळून, ईशनामस्मरण प्रार्थनापूर्वक प्राप्त कर्तव्य करीत राहण्यानेच ईशकृपा लाभून जन्माचे सार्थक होते.

२८. विवेक व काळच दुःख दूर करणारा आहे.

२९. प्रकृतीस जपून असावे. उपास तापास फार करू नयेत. शरीर दंडापेक्षा वाग्दंड व मनोदंड श्रेष्ठ आहे. संतचरित्राचे वाचन हे चित्तस्थैर्याला कारण होते असे 'वीतरागविषयं वा चित्तम्' असे योगसूत्रकार सांगतात.

३०. श्री दत्त श्री वासुदेव निवास,

२५.११.१९९१

सप्रेम सादर निवेदन वि. क्षेम. आपण देऊन गेलेले पत्रद्वय व भागवतातील सार वाचून संतोष झाला. मागील श्री. गोडसे यांच्या पत्रात, आपणाविषयी काही विचांर लिहीले त्याचा काही अनुवाद यातूनही होणे संभवनीय आहे.

आपले श्रवण, वाचन, हे चिंतन पर्यवसायी असते हे आपल्या भागवतसार लेखनावरून स्पष्ट होते. श्रोत्रेंद्रिय व योग्य विचारशील स्थिर होणाऱ्या मनाचे हे कार्य म्हणता येईल. असे मन सत्वप्रधान बनलेले, ज्याच्यातील रज व तम, हे गुण कमी, निष्प्रभ ठरलेले असतात असे असते. यालाच मनाची शुद्धी अथवा ईश्वरशक्तीची जागृती असे म्हणता येईल. शास्त्रदृष्टीने ही बहुत सुकृतांची जोडी आहे. असे मन शास्त्र व संतमहात्मे यांच्या संगतीने पुष्कळ काळाने अनेक जन्माने बनत आलेले असते. अशा मनातच, भगवंतांनी सांगितलेल्या दैवी गुण संपत्तीच्या विविध अंगांचा विशेष उद्‌भव होत राहिल्यामुळे या मनाच्या स्वामी जीवाला भगवंतांनी विभूति असे म्हटले आहे. ईशभक्तीचा विशेष आविर्भाव, जागृती जेथे दिसते ती विभूति. आपल्या सुकृतसंपत्तीमुळे आपल्या मनाची स्तब्धता – सत्वप्रधानता व्यक्त झाल्याने आंतला आवाज कार्य करतो असे आपणास

वाटले. शरीरामध्ये जीवात्म्याप्रमाणे दुसरी अंतर्यामी (ईश्वरजा) ईशशक्ती आहे. ती सर्व शरीरामध्ये असते. तिच्या अस्तित्वानेच त्रिगुणात्मक मनाला प्रेरणा होत असते. 'अपाणिपादोजवतोग्रहीता, पश्यत्यचक्षुः स शृणोत्यकर्णः' असे ईशशक्तीचे वर्णन आहे. म्हणजे ईशशक्तीला, जीवात्म्याप्रमाणे ज्ञानकर्म साधनांची अपेक्षा नाही. यामुळेच परमात्म्याला हृषीकेश-हृषीकांचा-इंद्रियांचा स्वामी असे सार्थ नाव आहे.

करणे कां न करणे। हे आघवे तोचि जाणे।
विश्व चळतसे जेणे। परमात्मेनी।

ही ओवी श्री ज्ञानराजांची, सर्वज्ञ सर्वशक्ती पूर्ण परमात्म स्वरूपाचा प्रकाश करणारी, 'एक तरी ओवी अनुभवावी' यापैकी असावी असे वाटते. अशा ईश शक्तीचा मनामध्ये आविर्भाव, जागृती, अनेक सात्विक रूपाने मनामध्ये होऊन राहिली असता, ते मन किंवा त्याचा स्वामी जीवात्मा, शेवटी अनेक जन्मांनी स्थितप्रज्ञ, ईश्वररूपच होऊन राहतो.

बहुनां जन्मनामन्ते ज्ञानवान् माम् प्रपद्यते।
वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः। भ.गी. ७.१९

असे श्री भगवान सांगतात, श्री ज्ञानराजही, या पूर्णतेस पोचलेल्या महात्म्याचे वर्णन 'किंबहुना दिवसराती। पुढिलांचे सुख उन्नती। आणित आणित स्वार्थी प्रवेशिजे।' या ओवीत

करीत आहेत. प्रपंचात राहूनही आपला पारमार्थिक प्रवास वरीलप्रमाणे उत्तम चालू आहे असे कोणाही विवेक संपन्न मनाला दिसून येईल. याप्रमाणे ईशशक्तीच्या जागृतीमुळे आपले मन, अहंकाराच्या पलीकडे जाऊन 'जै जगा धाकुटे होईज। तैं जवळीक माझी' या श्रीमाऊलीच्या सांगण्याप्रमाणे ईश्वराची जवळीक साधून राहिले आहे असे दिसून येते. 'परगुण परमाणु पर्वतीकृत्य नित्यम्' ही मनोवृत्ती शक्ती जागृतीचेच स्वरूप असल्याचा महात्म्यांचा अनुभव आहे. सर्वांना यथोचित नमस्कार व आशिर्वाद.

कळावे सज्जन कृपाभिलाषि.
दत्तात्रेय कवीश्वर

३१.

भूमिका

आजपर्यंतच्या प्रकाशित व आगामी प्रकाशित होणाऱ्या श्रींच्या पत्रातील उपदेश घेताना कटाक्षाने, लिहिलेल्या व्यक्तीचा नामोल्लेख हा टाळला आहे. उपदेशावर लक्ष केंद्रीत व्हावे हा उद्देश परंतु एक पत्र श्री महाराजांचे अंतरंग मोकळे करणारे, त्यांची व त्यांच्या कुटुंबियांची वेगळीच उंची दर्शविणारे आहे.

श्री महाराजांच्या जीवन प्रवासात त्यांनी कधीही स्वतःच्या कुटुंबियांची, इतर नातेवाईकांची कधीही स्तुती केली नाही.

अंतर्बाह्य वागणूक सारखीच आणि त्यांच्या समस्त कुटुंबियांनीही कधीच आम्ही महाराजांच्या घरचे म्हणून खास वर्तणूक द्यावी असे कधीही वागले नाहीत. तोरा मिरविला नाही किंबहुना श्री सारखेच स्वतःला झाकून घेतले. प्रस्तुत पत्रात श्रींच्या नातीचे लग्न ठरले आहे आणि त्यांना उपस्थित राहता येत नाहीये. मुलीचे / नातीचे लग्न हे एक दडपणच असते. त्यातून आता मोकळे होत आहोत ही एक सामान्य भूमिका येथे दिसते आणि स्वतःची स्वतःच लिहिलेली एक अत्यंत उच्च अशी असामान्य समाधी भूमिकाही ते लिहीत आहेत. या दीर्घ जीवनप्रवासात श्री महाराज स्वतः विषयी काहीतरी बोलले असे अत्यंत नगण्य प्रसंग आहेत. देहभान नाहीसे होणे – समाधी स्थिती, ही स्थिती श्री तुकाराम महाराजांचा 'नमो आदिरूपा ओंकारस्वरूपा। विश्वाचियारूपा पांडुरंगा।.... तुका म्हणे जेथे नाही मी तू पण। स्तवावे ते कवणे कवणालागी' हा अभंग ऐकल्यावर श्री प.प. श्री टेंबेस्वामी महाराजांची अशी स्थिती झाली होती असे त्यांच्या चरित्रात आहे. तशीच स्थिती स्वतःची असे श्री महाराज स्वतः लिहित आहेत. हे एक दुर्मिळ आश्चर्य/वजा वास्तव आपल्या पुढे येत आहे. अभंग वारंवार ऐकून आत्यंतिक प्रेमावस्था येणे व तृप्ती न होणे ही प्रेमाभक्तीची उत्कट भूमिका ते स्वतः लिहितायेत. स्वतःच्या भामिनीला

ते 'स्वयंप्रज्ञ प्रेमळ मामाई' असे विशेषण ते लावत आहेत. हे वाचल्यावर त्यांनी स्वतःवर घातलेले सामान्य गृहिणीचे पांघरूण तात्काळ उडून जाते. स्वयंप्रज्ञ प्रेमळ म्हणजे त्या साक्षात् कोण होत्या हे आता लपून राहत नाही. अशीच अत्यंत मार्मिक विशेषणे त्यांनी त्यांच्या मुलींबाबतही सांगितली आहेत. ती अत्यंत योग्य आहेत हे आज आपण त्यांच्या सहवासावरून अनुभवतो आहोत.

यात शेवटी सात्विक सुख आणि राजस सुख यांची तुलना करून ईश्वर प्रार्थना करत प्राप्त कर्तव्य करावीत असा उपदेश शेवटी दिला आहे.

श्री महाराज शेवटपर्यंत एक भक्त याच भूमिकेतून सतत वावरले. स्वतःचे मोठेपण हनुमंताप्रमाणे दडपून टाकले होते ते असे क्वचित प्रसंगी आपल्याला दृग्गोचर होत आहे.

३२. श्री दत्त श्री रेणुका निवास,

श्री दत्त जयंती १९९०

चि. सौ. सुलभा ताईस मंगल आशीर्वाद वि. क्षेम.

विश्व संरक्षक कुलदेव श्री लक्ष्मीव्यंकटेश बालाजी महाराजांच्या कृपेने आपण आज मोठ्या चिंतेतून मुक्त होत आहात हे समजून समाधान झाले.

सर्वांना धीर देऊन कार्य पार पाडणारी प्रत्युत्पन्नमती

चि.सौ.बडीताई (सौ. सुमनताई) तेथे उद्या उपस्थित होणार आहे. ‘स्वयंप्रज्ञ प्रेमळ सौ. मामाई (सौ. आईसाहेब), शांत राहून सर्वांना योग्य सल्ला देणारी कनिष्ठ भगिनी चि.सौ.शैलाताई, स्वतःची नियम्य भूमिका सांभाळून वागणारी सौ.सूनबाई (सौ.सविताताई), कु.रेणुका, उद्या या सर्वांना घेऊन स्वतंत्रतेने राहण्याचे, वागण्याचे भाग्य असून, नियम्य भूमिकाही बाळगून वागणारा, कृतज्ञ आयुष्यमान अजितमामा सपत्नीक उद्या तेथे हजर होत आहेच.

खर्ड्यास काही कार्यक्रम पूर्वीच ठरल्यावरून आमची केवळ शरीराने अनुपस्थिती असली, तरी आपल्या हळव्या मनास कष्ट पडणार नाहीत अशी आशा आहे. ही सर्व मंडळी सौ. कां. रंजूताईच्या विवाह समयी उपस्थित आहेतच. सुशिक्षित मनाची चि.सौ. नीलाताईही आली असेलच. (सौ. सुमनताईंची मुलगी) आईप्रमाणेच नैसर्गिक व्यवहारचातुर्य असणारी, वारंवार येथे येऊन मुली जवळ नसतानाही सौ. मामाईला समाधान देणारी चि.सौ. जयाताई गद्रे – ही मुंबईस तुम्हाला भेटून जात असे. परवा येथे भेटून सांगून गेली आहेच.

तुमचे मन ईश्वरभक्ती संपन्न आहे. मागे एकदा सौ. वत्सलाताई काळे यांचे घरी मुलुंडला आमचा मुक्काम असता रात्री तुम्ही तेथे आला त्यावेळी श्री नाथमहाराजांचा अभंग तुम्ही म्हटला ‘तुजवीण आम्हा असे कोण देवा, धाव यादवराया मायबापा’

हा तो श्री नाथांचा अभंग ऐकताच सर्वांचे डोळे, भगवत्प्रेमाने पाण्याने भरून आले होते. 'आमचे सुद्धा देहभान नाहीसे झाले'. मग हा महत्त्वाचा लक्षात ठेवण्यासारखा अभंग म्हणणारी, बहुत सुकृताची जोडी घेऊन जन्माला आलेली सौ. सुलभाताई, किती तळमळीने श्रद्धेने, प्रेमाने या अभंगाने देवाला आळवून स्वतःच्या मनालाही शांती मिळवत असेल. अशी मुलगी दिल्याबद्दल देवाला धन्यता द्यावी की त्याच्या या कृपेमुळे स्वतःची धन्यता समजावी हे समजत नाही.

'तुज स्वप्नि पाहिले गोपाळा' हे पद सौ. सुमनताईंच्या मुखातून भावावेशात निघालेले तिच्या लहानपणापासून कितीवेळा ऐकले तरी तृप्ती होत नाही. तसा हा श्री नाथांचा कोणाही दुःखी जीवाला तात्काळ शांती देणारा, दरबारी कानडा रागातील अभंग तुमच्या प्रेमपूर्व वाणीतून निघत असतानाही पुष्कळ वेळा ऐकून मनाचे समाधान होत नाही. समाधान देणारा अभंग ऐकून समाधान होत नाही याचा अर्थ तो अभंग तुमच्या वाणीतून पुन्हा पुन्हा समाधान लाभावे अशी इच्छा सर्वांना होते असा आहे. ही देवाची देणगी, सौ.कां. रंजूताईंच्या लक्षात आल्यास तिलाही खरे सात्विक समाधान मिळविता येईल आणि राजस सुखापेक्षा सात्विक सुखच ईश्वरदत्त असे सर्वोच्च असते ही जाणीवही होईल.

'दंपत्योः अविच्छिन्ना प्रीतिरस्तु'

हा शास्त्राने सांगितलेला आशीर्वाद तिला व तिच्या सहचराला श्री हरीने द्यावा इतकीच प्रार्थना आहे. सर्वांना यथोचित नमस्कार व आशीर्वाद.

श्री नाथांचा प्रार्थनात्मक अभंग, नित्य लक्षात ठेवून, शांत राहून प्राप्त कर्तव्याकडे लक्ष द्यावे हीच इच्छा.

एक हितैषी
दत्तात्रेय कवीश्वर

प.पू. योगीराज श्रीगुळवणी महाराज यांचे उत्तराधिकारी विद्यावाचस्पती - राष्ट्रीय पंडीत प.पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वरशास्त्री यांनी आशीर्वादात्मक केलेले गीतोक्त विशुद्ध कर्मयोगासंबंधी सर्वांना आचरणीय असे चतुःसूत्रीय समर्पक विवेचन.

॥ श्री गणेशदत्तगुरुभ्यो नमः ॥

श्री गुरुमहाराजांचा अमोघ संकल्प, गाणगापूर येथील 'श्री वासुदेवानंदसरस्वती धर्मशाळा' या स्वरूपाने सुफलित झालेला पाहून सर्व भक्तांना अत्यंत समाधान वाटून राहिले आहे. विशेषतः या संकल्पपूर्तीकरीता, तन, मन व धन समर्पण करणारे श्रीमान् गुरुभक्त गोविंदशेटजी साबळे व त्यांचे समानशील सर्व धार्मिक उदार सज्जन, धन्यवादास पात्र आहेत, हे प्रथम नमूद करून,

विशुद्ध कर्मयोगाबद्दल श्रीभगवंताचा काय आदेश आहे त्याचे थोडे चिंतन करावयाचे आहे.

मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्याध्यात्मचेतसा।
निराशीर्निर्ममो भूत्वा युध्यस्व विगतज्वरः॥ गीता अ. ३ श्लो. ३०

अर्जुनाला, युद्ध कसे करावे? ..... याबद्दल हा श्रीभगवंताचा उपदेश जरी असला तरी, 'सर्वाणि कर्माणि' या उपक्रमावरून तो सर्वकर्मसाधारण आहे असे समजण्यास हरकत नाही.

'कर्मयोगाची चतुःसूत्री' या श्लोकात श्रीभगवान सांगत असल्याने हा श्लोक अत्यंत महत्त्वाचा, अविस्मरणीय असा आहे. १) ईश्वरार्पण बुद्धी, २) फलेच्छात्याग, ३) कर्तृत्वाभिमान त्याग आणि ४) फलसिद्धी व असिद्धी यांबद्दल समत्वबुद्धी हे कर्मयोगाचे मुख्य चार सिद्धांत आहेत.

१) ईश्वरार्पणबुद्धी – सर्व हृदयस्थ परमात्माच बुद्धिप्रेरक असल्यामुळे व फलसिद्धीही त्याच्याच आधीन असल्याने, आपणाकडून होणाऱ्या लहान मोठ्या सर्व कर्मांना आपण फक्त निमित्त आहोत. 'केनापि देवेन हृदि स्थितेन यथा नियुक्तोस्मि तथा करोमि' ही दृढभावना कर्म करताना राहणे ही 'ईश्वरार्पणबुद्धी' होय. अशी बुद्धी ठेवून होणारी कोणतीही कर्मे, पुनर्जन्माला कारण न होता, ती अत्यंत शुद्ध ठरतात. त्यात उच्च-नीच भाव रहात नाही. 'कर्मशुद्धिर्मदार्पणम्' असे श्रीभगवंतांनी याबद्दल उद्धवाला सांगितले आहे.

२) फलेच्छात्याग – हा वरील श्लोकात 'निराशीः भूत्वा' या पदांनी सुचविला असून श्लोकाच्या पूर्वार्धांत ईश्वरार्पणबुद्धी सांगितली आहे. फलाकांक्षेत, शेख महंमदाप्रमाणे मन व्यग्र झाल्यास, कर्माकडे–प्रयत्नाकडे असावे तसे लक्ष राहू शकत नाही. त्यामुळे शैथिल्य, स्खलन होण्याचा संभव असतो. आणि शेवटी फळ मिळाले नाही किंवा मनासारखे मिळाले नाही तर दुःख होते. म्हणून फलसिद्धी स्वामींच्या इच्छेवर अवलंबून आहे. स्वामींच्या आज्ञेप्रमाणे कर्तव्यकर्म करणे, एवढेच सेवकाकडे आहे. अशा विचाराने अंतःकरण निष्काम ठेवण्याचा प्रयत्न करणे हे कर्मयोगाचे दुसरे सूत्र अंग होय.

३) कर्तृत्वाभिमानत्याग' – हे 'निर्ममः भूत्वा' या पदांनी सुचविले आहे. मी यात भाग घेतला, मी प्रयत्न केला म्हणून हे काम यशस्वी झाले, असा अहंकार कर्मासंबंधी उत्पन्न होणे घातक आहे. यामुळे फलदात्याबद्दल 'कृतज्ञता' बुद्धीच नष्ट होते आणि रागद्वेषादि दोषांमुळे अशांती निर्माण होते आणि ते कर्म शेवटी बंधक ठरते. याकरीता पहिली ईश्वरार्पण बुद्धी दृढ झाली असता, फलेच्छा व कर्तृत्वाभिमान हे दोन दोष आपोआपच नामशेष होऊन अंतःकरण प्रशांत होते व यामुळे ते कर्म अत्यंत विशुद्ध ठरते.

४. 'फलसिद्धी वा असिद्धी याबद्दल साम्यबुद्धी' – 'सिद्ध्यसिद्ध्योः समत्वम्' हे चौथे अंगही आवश्यक आहे.

म्हणजे, फलसिद्धी झाल्याने हर्ष अथवा फल न मिळाल्यास विषाद हे दोन्हीही विकार उद्भवत नाहीत आणि 'ठेविले अनंते तैसेचि रहावे। चित्ती असो द्यावे समाधान॥' ही अवस्था आपोआप प्राप्त होते.

असा हा कर्मयोग चौरंगी असल्याने, हा अभ्यास करताना, भगवत्भक्ती, विवेकज्ञान, तितिक्षा इत्यादी प्रधान साधनांचाही अभ्यास होऊ शकतो आणि तो कर्मयोगी ईशकृपेने भक्ती, ज्ञान यांमध्येही हळूहळू परिपक्व बुद्धीचा होऊ शकतो. हे कर्मयोगाचे महत्त्व आहे.

प्रस्तुत 'श्रीवासुदेवानन्दसरस्वती धर्मशाळा' हे द्रव्ययज्ञात्मक कर्मयोगाचे फल, ईशइच्छेनुसार सर्वांच्या पुढे उभे आहे. यात भाग घेणारे सर्वच सज्जन, ईशकृपापात्रता संपादन करून, मिळालेला मानवजन्म उत्तम प्रकारे सफल करतील अशी आशा आहे. 'स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः' या श्रीभगवदादेशानुसार, भारतवर्ष अशा कर्मयोगाने समृद्ध होवो हीच जगदीश्वराच्या चरणी प्रार्थना.

श्रीरामनवमी शके १९०१ — दत्तात्रेय कवीश्वर
दि. ५ एप्रिल १९७९ — श्रीवासुदेव निवास, पुणे ४.

**॥ अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ॥**

# प. पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांची 'प्रश्नोत्तर रत्नमालिका'

## ॥ श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नम: ॥

## प.पू. श्रींनी निरनिराळ्या प्रवचनात सोप्या भाषेत थोडक्यात श्रोत्यांना समजावलेले तत्त्व विचार - त्यांचा संदर्भ या प्रवचनातल्या विषयापुरता आहे.

१. मोक्ष म्हणजे काय?

दु:खाची कायमची निवृत्ती, पुन्हा दु:ख कधीही निर्माण न होणे.

२. आनंदाचे प्रकार -

आनंदाचे अनेक प्रकार उपनिषदांमध्ये सांगितले आहेत. मनुष्याचा आनंद, गंधर्वांचा आनंद, देवांचा आनंद वगैरे. हे सर्व आनंद, ज्याचे अंर्त:करण पूर्णपणे निष्काम, अहंकारादि विकार ज्याचे पूर्णपणे दूर झाले आहेत, ज्याला पूर्ण ज्ञान झाले आहे अशा महत् श्रोत्रिय महात्म्याला मिळतात.

३. ईश्वराची सेवा म्हणजे काय? मोक्षाकरता काय करावे? याचा खुलासा प. पू. श्रीमत् वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांच्या पुढील पदात केला आहे -

दत्ता मजला प्रसन्न होसी जरि तू वर देसी ॥
तरि मी आन न मागे तुजसी निर्धारूनि मानसी ॥ धृ. ॥

स्मरण तुझे मज नित्य असावे । तव गुण भावे गावे ॥
अनासक्तिने मी वागावे । ऐसे मन वळवावे ॥ १ ॥
सर्व इंद्रिये आणि मन हे तुझे हाती आहे ॥
यास्तव आता तू लवलाहे । स्वपदी मन रमवावे ॥ २ ॥
विवेक आणि सत्संगति हे नेत्रद्वय बा आहे ॥
वासुदेवा निर्मल देहे जेणे त्वत्पदिं राहे ॥ ३ ॥

४. श्रेष्ठ भक्ती कोणती?

सर्व भक्तीमध्ये स्मरण भक्ती श्रेष्ठ म्हणून सांगतात.

५. अभिमान कसा वाढतो?

ईश्वरशक्तीबद्दल विश्वास नसतो. ईश्वराचे सर्व कर्तृत्व आहे ही जाणीव नाहीशी झाली की अहंकार/अभिमान हा जास्त जास्त वाढीस लागतो.

६. विवेकाचे प्रकार –

नित्यानित्य विवेक – जगात स्थिर काय आहे. अस्थिर काय आहे. क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक – देह व आत्मा हे दोन वेगळे आहेत. शरीर म्हणजे मी नाही. हेयोपादेय विवेक – काय सोडायचे व काय घ्यायचे हे समजणे म्हणजे हेयोपादेय विवेक.

७. संतांच्या संगतीचा परिणाम –

विवेक सांगणारे, विवेक दाखवणारे महात्मे भेटले पाहिजेत. त्यांच्या संगतीत राहिले म्हणजे त्यांचे आचरण, विचार पाहून आपल्याला आपोआप ज्ञान होते. पण त्याकरता

चित्तामध्ये जिज्ञासा मात्र पाहिजे.

८. देवाकडे काय मागावे?

ईश्वराचे अखंड स्मरण, विवेक आणि संत संगती.

९. दुःख निवृत्ती कशाने होते?

विवेकाने होते.

१०. स्मरण भक्तीचे फळ –

पापक्षय, चित्तशुद्धी. मन शुद्ध झाल्यावर आपल्या हातून पापकर्म घडणारच नाहीत. कर्मक्षय झाल्यामुळे पुन्हा जन्ममरण नाही.

११. अविवेक व तो दूर करण्याचे उपाय?

अविवेक म्हणजे मोह. आत्मज्ञान, भगवत् भक्ती, कर्तव्य कर्म आणि चौथा अष्टांग योग हे चार उपाय भगवंतांनी सांगितले आहेत.

१२. संस्कार –

संस्कार म्हणजे बुद्धीमध्ये असणारे दोष दूर करुन विशेष गुण तिच्यामध्ये उत्पन्न करणं.

१३. बुद्धीचा विकास करुन घेण्याकरता ऋषीमुनींनी सांगितलेले शास्त्रीय प्रयोग करायचे.

१४. सिद्धी म्हणजे काय?

सिद्धी म्हणजे मानसिक शक्तीचा विकास.

१५. शास्त्राज्ञा मोडली तर काय होते?

शास्त्राज्ञा मोडली तर बुद्धीतली शक्ती नाहीशी होते.

१६. गीताभ्यास का करायचा?

बुद्धीची सुधारणा व्हावी, बुद्धीचा विकास व्हावा, चिंतन व्हावे, ईश्वराचा प्रसाद व्हावा.

१७. ईश्वर दर्शनाचा मुख्य सिद्धांत.

ईश्वर दर्शन आपल्याला व्हावे यासाठी प्रयत्न करायचा. भक्तीमार्ग त्याकरता आहे.

१८. संसाराचे स्वरुप –

संसार तरी काय आमच्या मनाची भावनाच आहे. खरं काय आहे? एकच स्त्री. तिच्या मातेला कन्या आहे, पतीला ती पत्नी आहे, पुत्राला ती माता आहे, सासूला सून आहे, भावाला बहिण वाटते आहे. तिचे पांच भौतिक शरीर एकच आहे. पण एकाच शरीराच्या ठिकाणी प्रत्येकाने आपापले एक भावनात्मक रुप वेगवेगळे तयार केले आहे. त्यामुळे संसार चाललेला आहे. भावनेवर संसार चाललेला आहे.

१९. धर्माचरणाचे महत्त्व –

धर्म भावना वाढत जाऊन शेवटी ईश्वराच्या कृपेने ईश्वराचे दर्शन झाले म्हणजे सर्वही भावना संपून जातात, चित्तशुद्धी होते, उन्नती होते व जगाचेही कल्याण होते. धर्माचरणाने ऐहिक फळ मिळो न मिळो ईश्वराची आज्ञा म्हणून त्याचे पालन करायचे.

२०. ईश्वरी अवताराचे प्रयोजन –

धर्मानुकूल भावनांची वृद्धी करणारे जे महात्मे आहेत त्यांच्या

संरक्षणाकरता. दैत्यांना शासन करण्याकरता व जीवांचे अज्ञान दूर करण्याकरता ईश्वराचे अवतार होतात.

२१. ईश्वराचे स्वरुप –

ईश्वर आत, बाहेर, सर्व दिशांमध्ये व सर्व कालांमध्ये आहे. एवढेच नव्हे तर सर्व रुपच तो आहे.

२२. क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक –

देहादिक पदार्थ जे सगळे आहेत त्यांना क्षेत्र असे नांव दिले आहे. क्षेत्रज्ञ म्हणजे आत्मा. शरीर, इंद्रिये यापेक्षा आत्मा वेगळा आहे हे समजून घ्यायचे आहे. यालाच क्षेत्रक्षेत्रज्ञ विवेक म्हणतात.

२३. साधनेला आरंभ कधी होतो?

विवेक आणि सत्संगती ही एक मोठी साधना आहे. शरीरात आणून सोडणारा कोण आहे, शरीरातून बाहेर घालवणारा कोण आहे याची सामान्य कल्पना आल्यानंतर त्या शक्तीबद्दल जिज्ञासा उत्पन्न झाली की त्या जीवाच्या ज्ञानसाधनेला आरंभ होतो. साधना मार्गात निरंतर राहिल्याने आपली बुद्धी दोषरहित होते. विशिष्ट गुण संपादन करता येतात आणि एखाद्या ज्ञानी महात्म्याची गांठ पडून जास्त मार्गदर्शन मिळून विकास होतो.

२४. सूक्ष्म शरीर –

पंच ज्ञानेंद्रिये, पंचकर्मेंद्रिये, पंचप्राणेंद्रिये, मन व बुद्धी असे १७ पदार्थ साधनरुप आहेत. वेदांत शास्त्र यांना सूक्ष्म

शरीर असे म्हणते.

२५. ज्ञान संपादन कसे करावे?

ज्ञान संपादन करण्याकरता कोणते दोष घालवले पाहिजेत, कोणते गुण संपादन केले पाहिजेत हा विचार करणे याला शास्त्रकार ज्ञानच म्हणतात. ज्ञानाची साधना हेच ज्ञान आहे. साधना पक्की झाली, मनांत, बुद्धीत मुरली की त्या बुद्धीमध्ये पूर्ण समाधान आहे.

२६. देवाजवळ काय व कां मागावे?

''पापं तापं व्याधिमाधिचं दैन्यं । भीतिं क्लेशं त्वं हराऽशुत्वदन्यम् । त्रातारं नो वीक्ष ईशास्तजूर्ते । घोरात कष्टात् उद्धरास्मान्नमस्ते ।'' या श्लोकात सद्गुरु वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांनी देवाजवळ काय मागावे हे सुचविले आहे. जीवांना त्याची आवश्यकता आहे. आपल्याला जे मागायचे ते देणारा ईश्वरच आहे. म्हणून इतरांजवळ मागण्यापेक्षा ईश्वराजवळ मागायला हरकत नाही असे ते म्हणतात.

२७. आपल्याला दु:ख कां भोगावे लागते?

दु:ख जी आपल्याला भोगावी लागतात त्याचं कारण आपल्याकडून घडलेली पापं.

२८. दैव व कर्माची व्याख्या –

सुखदु:ख दैवाने मिळतात. दैव याचा अर्थ आपल्या हातून पूर्वी घडलेली कर्मे. पूर्वी केलेला प्रयत्न म्हणजे दैव व

सध्या चालू असलेला प्रयत्न म्हणजे कर्म.

२९. दु:खाचे तीन प्रकार –
आध्यात्मिक, आधिदैविक आणि आधिभौतिक.

३०. ईश्वराच्या उपासनेची आवश्यकता –
पाप, ताप, आधि, व्याधि, इ. सात दोष (पापं तापं व्याधिमाधिचं दैन्यं । भीतिं क्लेशं त्वं हराऽशुत्वदन्यम् । त्रातारं नो वीक्ष ईशास्तजूर्ते । घोरात कष्टात् उद्धरास्मान्नमस्ते ।) ईश्वरानेच दूर करावेत. कारण तो या दोषांपासून अलिप्त आहे. त्यामुळे या दोषांनी जर्जर झालेल्या जीवांचे दोष तो दूर करतो.

३१. दैन्य व क्लेश –
दैन्य म्हणजे दारिद्र्य आणि मनाची अत्यंत निराशाजनक अवस्था की ज्या अवस्थेत आपल्या हातून चांगले कांहीही (परमार्थही नाही व व्यवहारही नाही) घडत नाही. क्लेश म्हणजे मनांत सतत उत्पन्न होणाऱ्या इच्छा, राग, द्वेष, अज्ञान हे सर्व दोष, अविद्या भ्रांती.

३२. कर्म सदोष कां होतात?
आपण कर्म करायचे व आपण सुखी व्हायचे म्हणजे देहाला सुखी करायचे. पूर्वीच्या पापपुण्याचा, कर्माचा, नीती अनीतीचा कशाचाही विचार नाही. संबंध नाही. मला सुख मिळाले पाहिजे. न्याय अन्याय कांही पाहिले जात नाही. एकाला अशी कर्मे करताना पाहून दुसराही तेच करतो.

त्याला जर अशा वागण्याने, कर्माने सुख मिळते मग मीही तसेच कां करु नये? पण त्यामुळे सामुदायिक दुरित तयार होतात. अशी दुरित तयार झाली समाजात, राष्ट्रात व शेवटी विश्वात की सुख, शांती, समाधान नाहीसे होते.

३३. सकाम कर्म कां नको?

ध्रुवाने खडतर तपश्चर्या करुन सर्वोच्च स्थान मिळवले. पण नंतर त्याला पश्चात्ताप झाला. काय मागितलं मी, म्हणाला. आता या सर्वोच्च स्थानांत राहायचे म्हणजे इतर हेवा करणारच. अशा प्रतिबंधामुळे सुख कसे लाभणार? शिवाय त्यामुळे अहंकारही होण्याचा संभव आहे. इतरांपेक्षा मी मोठा आहे असे वाटू लागणार. म्हणजे ईश्वराकडे लक्ष कमी होणार. ज्याच्या कृपेने हे आपल्याला मिळाले त्याची आठवण राहील की नाही हाही एक पुन्हा प्रश्न आहे. असे अनेक दोष ध्रुवाच्या लक्षात आल्यावर त्याला पश्चात्ताप झाला. चुकलो म्हणाला. पण आता इलाज नाही. म्हणून सकाम कर्म नको जे म्हणतात ते या करता.

३४. अहंकार –

अनुकूल, सुखाची परिस्थिती आली म्हणजे अहंकार वाढतो. अहंकार गेल्याशिवाय खरं ज्ञान होत नाही. जन्माचा, ज्ञानाचा, संपत्तीचा, सत्तेचा अशा निरनिराळ्या अहंकारामध्ये जीवात्मा गुरफटून गेल्यामुळे त्याला ईश्वराचे ज्ञान होत नाही. ईश्वर शक्तीची जाणीव झाली तरच अहंकार

उत्पन्न होत नाही.

३५. देवाजवळ काय मागावे?

हे श्री महाराजांनी पुढील श्लोकात सुचवले आहे – ''धर्मे प्रीतिम् सन्मतिम् देव भक्तिम् । सत्संगाप्तिं देहि भुक्तिं च मुक्तिम् । भावासक्तिम् चाखिलानंदमूर्ते । घोरात् कष्टात् उद्धरास्मान्नमस्ते ॥''

३६. सुखाचे पुरुषार्थ –

मैत्री, करुणा, मुदिता, उपेक्षा हे उपाय योगशास्त्रकारांनी मन स्थिर, शुद्ध करण्याकरता सांगितले आहेत.

३७. असुर कोणास म्हणावे?

इतरांचा विचार न करता आपल्याला अनुकूलता मिळवणारे असुर. असु म्हणजे प्राण. आपल्याच प्राणांना जपणारे, आपल्याच स्वार्थाचा विचार करणारे ते असुर.

३८. तामसी/सात्विक वृत्ती –

इतरांना सुख कां मिळावं आपल्याला कां मिळू नये, उलट इतरांना मिळू नये अशाही इच्छा असतात, ज्याला आपण मत्सर म्हणतो. दुसऱ्याचे चांगले पाहिल्यावर द्वेष उत्पन्न होतो आहे. याला तामसी वृत्ती म्हणतात. दुसऱ्याचे सुख पाहिल्यावर आपल्याला सुख वाटणे याला सात्विक वृत्ती म्हणतात. आपल्याच मनांमध्ये देव दैत्य आहेत असे उपनिषदामध्ये सांगितले आहे. सात्विक वृत्ती म्हणजे देव आणि तामसी वृत्ती म्हणजे दैत्य. यांचे युद्ध नेहमी चालू

असते. जेव्हां सात्विक वृत्तीचा जय होतो तेव्हां आपल्या हातून पुण्यकर्म घडतात व जेव्हा तामसी वृत्तीचा जय होतो तेव्हां आपला अध:पात होतो.

३९. पारमार्थिक उन्नतीचे उपाय –

ज्याला आपली पारमार्थिक उन्नती करुन घ्यायची आहे त्याने व्यवहार कमी करीत आणला पाहिजे. मैत्री, करुणा, मुदिता, उपेक्षेचा अभ्यास केला पाहिजे.

४०. हेयोपादेय म्हणजे काय?

हेय म्हणजे सोडायचे काय, आणि उपादेय म्हणजे घ्यायचे काय. ग्राह्य काय आणि अग्राह्य काय या विचाराला हेयोपादेय विवेक म्हणतात.

४१. मुक्ती देणारी भुक्ती –

भुक्ती म्हणजे भोग. महाराजांनी संसारही मागितलेला आहे. कारण संसार दूर करा असे देवाजवळ मागायचे म्हणजे तितका अधिकार पाहिजे. संसार नको असे ‘आपातत:’ (पहिल्यापासून) म्हटले जाते परंतु संसार सोडण्याची खरी इच्छा अंत:करणामध्ये उत्पन्नच होत नाही. स्वत:च्या तपाने, मिळालेल्या भोगामुळे अहंकार उत्पन्न होतो. भोग हा उपादेय आहे. भोग जर ईश्वराजवळ मागून घेतला शुद्धबुद्धीने, देवा, माझ्या वासना कांही जात नाहीत मला भुक्ती पाहिजे, तर ती भुक्तीसुद्धा त्याला मुक्ती देणारी होते.

४२. भावासक्ती –
भुक्तीच्याही पुढचे मागणे म्हणजे भावासक्ती. अंत:करणात नितांत प्रेम उत्पन्न व्हावं. भक्तीपेक्षाही अत्यंत श्रेष्ठ उपादेय वस्तू भावासक्ती मानली आहे. ही जर अंत:करणात उत्पन्न झाली तर सर्वही कल्याण होतं. मुक्ती आली काय आणि गेली काय.

४३. योगाभ्यासाची दोन महत्त्वाची साधने –
अत्यंत दृढ निश्चय पाहिजे साधनेचा आणि मनामध्ये निराशा उपयोगी नाही. उत्साह कायम टिकला पाहिजे. ही दोन साधने योगाभ्यासाला, साधनाभ्यासाला आवश्यक, पोषक म्हणून भगवंतांनी सांगितली आहेत.

४४. साधकाची संदिग्ध अवस्था –
निश्चयात्मक बुद्धी नसणे. कांही दिवस ही साधना करायची. पुन्हा त्याच्याबद्दल कांही संशय येऊन मनानेच निर्णय घेतला की याचा कांही उपयोग नाही आणि दुसरे साधन करायला घ्यावे किंवा आहे ते करुच नये.

४५. सद्‌गुरुंचे स्वरुप –
''अखंड आत्मा अविनाशी दत्त । तया पदी लाविती जे स्वचित्त। वित्त भ्रमा सोडिती ते कृतार्थ । तो पूर्ण आनंद गुरु समर्थ ।'' सद्‌गुरुचे वर्णन करताना महाराज म्हणतात, ते पूर्ण रुप आहे, आनंदरुप आहे आणि समर्थ आहे. दत्तात्रेयांचे सगुण रुप षड्‌भुज, चतुर्भुज आणि द्विभुज आहे.

वेगळी वेगळी रुपे त्यांनी दाखवली आहेत. पण मुख्य जे रुप आहे ते अखंड (म्हणजे ज्याच्यात भिन्नता नाही) आहे. सर्व देशामध्ये आहे. अविनाशी आहे म्हणजे कांही मर्यादित कालापुरते आहे असे नाही, सर्व कालात आहे.

४६. संशय, भीती –

हांक मारणाऱ्या द्रौपदीची बुद्धी निश्चित आहे. श्रीकृष्ण जर द्वारकेत आहेत असे तिला वाटले असते तर तिने हांक मारली असती का? आणि इतक्या लांब हांक पोहोचणार कशी? एका मागे एक संशय उत्पन्न होतात. लांब आहे श्रीकृष्ण अर्थात त्याला माझी हांक ऐकू जाणार कशी? आला तरी काय करणार? कांहीही उपयोग नाही हांक मारुन. मृत्यु जवळ आलेलाच आहे, असे वाटून निराश झाली असती तर. परंतु भगवंताचे स्वरुप सर्वत्र आहे, त्याची शक्ती फार मोठी आहे तो माझे संरक्षण करणार आहे, अशी तिला खात्री असल्यामुळे ती हांक मारते आहे. अनेक प्रकारच्या भीती संसारामध्ये असतात. परमार्थामध्ये कांही भिण्याचे कारण नाही.

४७. वित्तभ्रम –

विद्या, उपासनेलाही दैववित्त असे म्हणतात. उपासनेबद्दल भ्रम निर्माण होतो. या वित्तभ्रमामुळे साधक निश्चयापासून ढळतो. त्याला मिळालेली बुद्धी अवस्था जाते. संरक्षणाचा अहंकार आम्ही आमच्यावर घेतल्यामुळे आम्हांला भ्रांती

निर्माण होते. हा वित्तभ्रम गेला पाहिजे.

४८ वेदांताचा अभ्यास कोणी करावा?

शास्त्राने साधन चतुष्टय संपत्ती म्हणून जी सांगितली आहे– विवेक, वैराग्य वगैरे – ही सगळी साधने ज्याच्याजवळ आहेत त्याने वेदांताचा अभ्यास करावा, आणि आपली उन्नती करुन घ्यावी.

४९. महात्म्यांची भेट –

संतांची संगती होणे कठीण आहे. संतांच्या बद्दल मनांत अनादर असेल तर ही संगती घडणारही नाही आणि घडली तरी उपयोगही होणार नाही. त्यांचे सांगणे योग्य आहे हे समजण्याची आपली अहंकाररहित बुद्धी पाहिजे तर त्यांच्या मार्गदर्शनाचा उपयोग होऊ शकेल.

५०. संतांच्या ग्रंथांचे महत्त्व –

संतांनी सामान्य जीवांना समजेल अशा सोप्या भाषेत उत्तमोत्तम ग्रंथ करुन ठेवले आहेत. त्यांचे मनन झाले पाहिजे. आदरबुद्धी, जिज्ञासा पाहिजे तर त्या ग्रंथातील ज्ञान आपल्याला मिळू शकेल. त्या ग्रंथांचे वाचन हितकारक आहे. त्यांच्या वाचनाने आपल्याला मार्गदर्शन होऊन त्यांनी दाखविलेल्या मार्गाने जाण्याची बुद्धी जर ईश्वर प्रसादाने आपल्याला झाली तर आपल्यात सुधारणा होणे शक्य आहे.

५१. भोगणे ते फळ संचिताचे –

तुकाराम महाराजांनी सांगितलेला सिद्धांत आहे. केव्हा

जाईल दु:ख, केव्हा जाईल दु:ख असे नुसते म्हणून उपयोग नाही. जे आपल्या हातून कर्म घडलेलं आहे त्याचं फळ आपल्याला भोगावे लागते हा एक मोठा सिद्धांत आहे आणि तो आपल्याला मान्य करावा लागतो. एका रोग्याला बरा करणारा डॉक्टर तसाच रोग झालेल्या दुसऱ्या रोग्याला तेच औषध देतो पण पहिल्याला गुण येतो दुसऱ्याला येत नाही. काय झाले? औषध देणाऱ्याचे ज्ञान कमी पडले? नाही. डॉक्टरही तोच, औषधही तेच व रोगही तोच मग असे कां व्हावे? तर तिथे हा सिद्धांत आहे. एकाला फळ मिळते दुसऱ्याला मिळत नाही. या वरुन कांही तरी प्रतिबंध आहे पण तो दिसत नाही. या वरुन या जीवाचे पूर्वीचे कांही तरी कर्म आहे हे मानावे लागते. ही कर्म शक्ती ईश्वराने निर्माण करुन ठेवली आहे.

५२. ईश्वर कशाला हवा?

कर्म अचेतन आहे. जीवाने चांगले कर्म केले हे जाणणारा कोणीतरी लागतो. सर्वांच्या कर्माचे त्याला ज्ञान आहे. कर्माप्रमाणे फळ तो देतो. व्यवहारातही कर्म जाणणारा कोणी तरी लागतो. एखादा माणूस ऑफिसात वेळेवर येतो, चांगले कर्म करतो, वाटेल तशा रजा घेत नाही हे जाणणारा जो वरचा अधिकारी असतो त्याच्या शिफारसीप्रमाणे ह्याला आपल्या कर्माचे चांगले प्रमोशन मिळते.

५३. प्रल्हादजींचे देवाजवळ मागणे –

मनामध्ये कोणतीही इच्छा नको, शुभ वासनाही नकोत आणि अशुभ वासनाही नकोत. निष्काम अंत:करण व्हावं हे मागणं आहे आणि त्याचं कारण त्यांनी दिलं आहे की ज्या वेळी जीवाच्या अंत:करणातल्या, बुद्धीतल्या सगळ्या कामना नाहीशा होतील त्यावेळी त्याचा जीवभावच संपला. म्हणजे तो भगवत्स्वरुप झाला.

५४. पांच कोश –

१) पंचमहाभूतांपासून निर्माण झालेल्या स्थूल देहाला अन्नमय कोश म्हणतात. हा अन्नाने वाढतो व अन्नामध्येच विलीन होतो. इथे अन्न याचा अर्थ पृथ्वी. २) पंच प्राण, पंच कर्मेंद्रिये मिळून प्राणमय कोश सांगितला आहे. ३) ज्ञानेंद्रिये आणि मन मिळून मनोमय कोश म्हणतात. ४) ज्ञानेंद्रिये आणि बुद्धी मिळून विज्ञानमय कोश म्हणतात आणि ५) शेवटी कारणशरीर आनंदमय कोश आहे.

५५. अनुसंधान –

अनुसंधान म्हणजे ध्यान. आत्मस्वरुपाचे अनुसंधान करता करता समाधी अवस्था प्राप्त झाली म्हणजे साक्षात्कार होतो. ते अनुसंधान होण्याकरता मनाचे संशोधन झाले पाहिजे. ''स्वरुपानुसंधान व्हाया कीजे मन:शोधन । देवगुरु सेवन सदाचरण अनासक्ते ।''

५६. साधना मार्गातील विघ्ने –

आत्मानुसंधान करणाऱ्या साधकांना निरनिराळ्या विघ्नांना तोंड द्यावे लागते. त्यातले पहिले विघ्न म्हणजे झोप. झोप आली की मनाचा लय होतो. झोप जास्त येऊ नये म्हणून मिताहार व हिताहार ठेवला पाहिजे. त्यानंतर दुसरा दोष म्हणजे मनांत निरनिराळ्या वृत्ती निर्माण होणे. या वृत्तीतच माणूस रमून जातो. वृत्ती निर्माण होणे हा संसार आहे आणि वृत्ती नाहीशी होणे हा मनोनाश आहे. त्या नंतर रसास्वाद हा मोठा भयंकर दोष उत्पन्न होतो. आपली प्रसिद्धी आपल्या तोंडाने करायची. मला इतका अनुभव आलेला आहे, माझी इतकी प्रगती झालेली आहे असे स्वत:च लोकांना सांगत सुटायचे. माझे चित्त इतके सात्विक झाले आहे, असे समजणे व लोकांना सांगणे हा रसास्वाद फार घात करणारा आहे. यामुळे साधनेत प्रतिबंध निर्माण होतो.

५७. अभिमान –

अभिमान असल्यामुळे स्वत:कडून होणाऱ्या दोषांची जाणीवच होत नाही. मी नेहमी उत्तमच वागतो, माझ्या हातून कधी चुका होतच नाही असेच वाटते अभिमानामुळे. दुर्योधनाच्या, कौरवांच्या अभिमानामुळे त्यांचा नाश झाला.

५८. अहंकार –

अहंकार हा दुसरा मोठा दोष आहे. तो दूर व्हायला पाहिजे. अहंकार ही मनाचीच वृत्ती आहे. ती बुद्धी सुसंस्कारीत

व्हायला पाहिजे.

५९. वासनाक्षय –

वासनाक्षय होण्याकरता ईश्वरभक्तीची जरुरी आहे. तो झाला की अहंकार नष्ट होतो.

६०. असंभावना –

असंभावना म्हणजे मनाला सिद्धांत, उपदेश वगैरे न पटणे. तो बुद्धीचा स्वभाव आहे.

६१. जिज्ञासा –

जिज्ञासा हा मोठा गुण आहे. ज्ञानार्जन करण्याच्या इच्छाशक्तीला जिज्ञासा म्हणतात. तीव्र जिज्ञासा असल्याशिवाय ज्ञानार्जन होऊ शकत नाही. काय आहे पाहू या तरी, त्याचं ज्ञान मिळवू या. ज्ञान होऊ शकतं. जिज्ञासा जिथे नाही तिथे कांही नाही. सगळेच असंभवनीय म्हणून टाकून दिलेले आहे. त्याचा विचारच कधी केलेला नाही. जिज्ञासा असेल तर विचार होऊ शकतो. तो विचार केल्यानंतर ज्ञान होऊ शकतं.

६२. भोगबुद्धी –

भोगबुद्धी हा मोठा दोष आहे. मनामध्ये भोगबुद्धी निर्माण झाली तर साम्यवाद निर्माण होतो. अशांती निर्माण होते.

६३. अर्थसंग्रह –

अर्थसंग्रह हा दोष नाहीये. संग्रह पाहिजे. राष्ट्रालासुद्धा संग्रहाची आवश्यकता आहे. त्यागाकरता संग्रह होत असेल

तर त्या ठिकाणी साम्यवाद बिलकूल येणार नाही.

६४. कर्मयोग –

कर्मयोग मग तो सांसारिक असो, व्यावहारिक असो किंवा पारमार्थिक असो जे कांही कर्म आपल्या हातून घडतय ते सर्वही ईश्वराला अर्पण करणं. त्याची आज्ञा म्हणून मी साधन करतोय, त्याच्या प्रेरणेने करतोय ही बुद्धी धारण करुन करा एवढेच शास्त्रकार म्हणतात. ईश्वरार्पण बुद्धीने, निरहंकार वृत्तीने घडणारं कर्म म्हणजेच भागवतधर्म आहे असे योगींद्रांनी निमी राजाला (श्रीमत् भागवतात) सांगितले आहे. चांगली आणि वाईट दोन्ही कर्म होतात. पापकर्म कोणचं आणि पुण्यकर्म कोणचं हे शास्त्रानेच समजून येते. चांगली बुद्धी होण्यासाठी चांगली कर्म केली पाहिजेत. कर्माप्रमाणे पुन्हा पुन्हा जन्म घ्यावे लागतात हे सगळ्या संतांनी सांगितलेले आहे.

६५. आत्मोद्धाराचे तीन उपाय –

प्राचीन धर्मशास्त्रज्ञांनी आत्मोद्धार करण्याकरता कर्मयोग, ज्ञानयोग व भक्तीयोग असे तीन उपाय सांगितले आहेत. भगवत् गीतेमध्ये या तिघांचेही स्पष्टीकरण केले आहे.

६६. अधिकार –

आत्मोद्धाराचे उपाय जरी सांगितले असले तरी सगळेच कांही त्यांचे अधिकारी नाहीत. महाविद्यालयामध्ये विद्येच्या अनेक शाखा आहेत. म्हणून कोणचाही विद्यार्थी आपल्या

इच्छेप्रमाणे कोणत्याही शाखेला जाऊ शकत नाही. त्याच्या बुद्धीच्या योग्यतेप्रमाणे शाखा निवडली जाते. तसे पारमार्थिक दृष्ट्याही ज्याच्या त्याच्या अधिकारानुसार, योग्यतेनुसार त्याला उपदेश करतात. 'अधिकार तैसा करु उपदेश' आणि त्याप्रमाणे मार्गदर्शन करतात.

६७. ईश्वराला कां मानायचे?

याबद्दल शिवमहिम्न स्तोत्रात एक युक्तीवाद मांडला आहे. जगाचा एक निर्माता, अधिष्ठाता, नियमकर्ता, शासनकर्ता कोणी तरी असल्याशिवाय का हे जग निर्माण झाले?

६८. मनाची एकाग्रता -

म्हणजे एका ठिकाणी मन स्थिर होणं. मन चंचल आहे, त्याला स्थिर राहण्याची माहिती नाही म्हणतात. पण त्यालाही स्थिर करता येतं. अभ्यास, प्रयत्न केले पाहिजेत. गीतेच्या ६व्या अध्यायात तो सगळा अभ्यास सांगितला आहे. मनामध्ये उद्धटपणा, अहंकार बळावला की ईश्वरभजन, धर्माचरण आणि मनाची एकाग्रता होऊ शकत नाही. पण त्याचा स्वभाव बदलता येतो. त्यासाठी अभ्यास व वैराग्य पाहिजे. अभ्यास म्हणजे मन स्थिर करण्याचा प्रयत्न करणे.

६९. आपण कोणता तत्त्वविचार केला पाहिजे -

आत्मस्वरुप काय आहे, आपण कोण आहोत, या जगाचा कर्ता कोण आहे, त्याची शक्ती काय आहे, हे जग काय

आहे आणि या सगळ्याचा आणि माझा काय संबंध आहे हा मुख्य तत्त्व विचार आहे.

७०. मनावर होणारे संस्कार –

अनेक जन्मांचे बरे वाईट संस्कार मनावर झालेले असतात, होत असतात आणि त्या संस्कारांप्रमाणे बरे वाईट विचार आपल्या मनात येत असतात. त्या संस्कारांप्रमाणे बरी वाईट कर्म आपल्या हातून घडत असतात. संस्कारांमुळे मनात येणारे विचार हा मोठा प्रतिबंध आहे. यालाच मनोराज्य असेही म्हणतात. नाना प्रकारच्या वासना, संस्कार, विचार तरंग मनामध्ये येतात आणि ईश्वराचा विचार बाजूलाच राहतो.

७१. आहार –

मनाची शुद्धी आहारावर अवलंबून आहे. ईश्वराबद्दलचे प्रेम वाढत जाण्याकरता शुद्ध आहाराची गरज आहे. आपल्या आहारातल्या अत्यंत शुद्ध अंशापासून मन तयार होते. मनाची शुद्धता आपोआप होऊ लागते.

७२. प्रयत्नवाद –

प्रपंचामध्ये आपण प्रयत्न करतो सुखी होण्याकरता. परमार्थामध्ये कांही प्रयत्न नाहीत, नुसतं भजन करायचं आहे, काय त्याचा उपयोग आहे असं वाटतं आपल्याला सुरवातीला. पण लगेच कसा उपयोग होणार? कोणालाही नोकरीला लागल्यावर लगेच कायम करीत नाहीत. त्याचे

काम, वागणूक पाहून निर्णय घेतात. व्यावहारिक प्रयत्नसुद्धा एकदम सफल होत नाहीत. परमार्थ हा तर मोठाच प्रयत्नवाद आहे. संतांना त्यांच्या प्रयत्नाप्रमाणे लाभ झालेला आहे. ज्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली त्यांना ईश्वराचे सहाय्य झालेले आहे.

७३. प्राणायाम –

प्राणायामाचा अभ्यास जो सांगितला आहे, तो चांगल्या माहितगार मनुष्याच्या मार्गदर्शनाप्रमाणेच केला पाहिजे. नुसते पुस्तक वाचून नाक दाबून तोंड दाबून धरणं आणि प्राणवायू कोंडून ठेवणं म्हणजे कांही प्राणायाम नव्हे. प्राणवायूचा संचार शरीरातील असंख्य सूक्ष्म नाड्यातून चालू आहे. त्याचा निरोध करुन तो भलत्या नाडीत गेला तर वेड लागायची पाळी येते.

७४. सूक्ष्म शरीर –

पंच ज्ञानेंद्रिये, पंचप्राण, पंचकर्मेंद्रिये, मन आणि बुद्धी या सगळ्या साधन वर्गाला मिळून सूक्ष्म शरीर असे वेदांत शास्त्राप्रमाणे म्हणतात, सूक्ष्म शरीरालाच लिंग शरीर म्हणतात. हे जोपर्यंत स्थूल शरीरात आहे तोपर्यंत जीवन आहे.

७५. वेदांत –

वेदांत शास्त्र म्हणजे आत्मा किंवा अनात्मा या पदार्थाचा विचार करणारे शास्त्र. वेदाचा अंत म्हणजे शेवट असा

अर्थ नव्हे. अंत भाग म्हणजे निश्चयात्मक भाग. वेदामध्ये सांगितलेल्या पदार्थाचा निश्चय ज्याच्यामध्ये केला आहे असा भाग म्हणजे उपनिषदे. सगळ्या उपनिषदांना वेदांत असे म्हणतात. श्री शंकराचार्यांनी वेदांतावर भाष्य करुन तो समजावून सांगितला आहे.

७६. ज्ञान आणि विज्ञान –

संपूर्ण वेदांचे सार काय आहे, शास्त्राचे सार काय आहे हे समजून येणे म्हणजे ज्ञान व त्या ज्ञानाचा अनुभव येणे हे विज्ञान.

७७. अंत:करण –

अंत:करण म्हणून जे कांही तत्त्व ईश्वराने निर्माण केले आहे त्याला मन किंवा बुद्धी असे म्हणतात. अवस्थाभेदाप्रमाणे नांवे आहेत. प्राथमिक अवस्थेमध्ये, निर्णय कांही नाही अशा अवस्थेमध्ये, त्याला मन असे म्हणतात. संदेहात्मक मन आहे. बुद्धी ही अवस्था निर्णयात्मक आहे. तो निर्णय चांगला किंवा वाईट कसाही असो. निश्चय झाला म्हणजे त्याला बुद्धी असे नांव आहे.

७८. भ्रांती –

साधनाकालामध्ये आपल्याकडून कांही साधना होत आहे याबद्दल मनात भ्रांती निर्माण होते. माझ्या साधनेत मला असे अनुभव येतात, माझी प्रगती आहे, मी मोठा उपासक आहे वगैरे. हा भ्रम गेला पाहिजे. ईश्वराची साधना करणे हे

आपले कर्तव्य आहे. साधना कशी का घडेना, कमी घडेल जास्ती घडेल, तिकडे लक्ष द्यायचे नाही. कारण आपल्या सर्व ज्ञानेंद्रियांना, मनाला, बुद्धीला प्रेरणा देणारी एकच ईश्वराची शक्ती आहे हे जर मनाला पटले असेल, बुद्धी निश्चित झाली असेल तर कमी जास्तपणाचा विचार तरी कशाला करायचा. ही भ्रांती दूर होण्याकरता ''बुद्धी दे रघुनायका'' अशी समर्थ प्रार्थना करतात.

७९. भक्ती –

मानवांना मुख्य धर्म भक्ती आहे. ती भक्ती अहेतुकी असावी. हेतु मनामध्ये नसावा. भगवंतावर निर्हेतुक प्रेम पाहिजे आणि अप्रतिहत भक्ती पाहिजे. श्वासोच्छ्वास आपोआप चालू असतो. त्याला कांही प्रयत्न करावा लागत नाही. त्याचा कांही हेतु नसतो. कशाकरता श्वासोच्छ्वास करता विचारले तर सांगता येणार नाही आणि तो अप्रतिहत आहे. झोप लागली तरी तो चालूच आहे. त्याप्रमाणे अखंड भक्ती मनामध्ये उत्पन्न झाली पाहिजे. सत्संगती, भगवत्कथा श्रवण वगैरेंनी आपल्या मनांत खरी भक्ती, परा भक्ती उत्पन्न होते आणि अशी शुद्ध भक्ती उत्पन्न झाल्यावर कामक्रोधादि सगळे विकार मनांतून निघून जाऊन मन शांत होते. भक्तीने आणखी एक कार्य म्हणजे ज्ञानप्राप्ती आहे.

८०. निश्चयात्मिका बुद्धी –

रोजच इतकं नामस्मरण करायचा नियम करायचा. इतकं

चिंतन करायचं. संतांच्या ग्रंथांचं अवलोकन करायचं असा निश्चय पाहिजे आणि तो टिकला पाहिजे. नाही तर ''काय हो, इतके दिवस मी साधना करतो माझ्या मनाची स्थिती अजून सुधारत नाही'' किंवा ''माझ्या इतकं तरी कोण करणार आहे? मी तरी पुष्कळ करतो'' असं वाटलं, अशी निराशा झाली की निश्चयही गेला आणि सगळंच गेलं. पुढचा मार्गच बंद झाला. परमार्थ मार्गात संतोष हा मोठा दोष आहे.'' पुष्कळ झालं की इतकं तरी काय करायचयं अजून करुन. एकदा वारीला जाऊन आलं म्हणजे नेहमी कशाला जायला पाहिजे? त्याच पांडुरंगाचे तेच दर्शन. हे असे विचार मनांत आले की प्रयत्न थांबतो. अखंड भजन चाललं पाहिजे. म्हणजे त्या योगाने सुधारणा होते. अनेक जन्मांचे हे दोष आंहेत ना ! हे दोष घालविण्याकरता किती प्रयत्न केला पाहिजे ! परंतु हा प्रयत्न सफल होतो असे संत महात्मे सांगतात !

८१. प्रयत्नवाद –

परमार्थ, भगवंताची भक्ती हा सुद्धा प्रयत्नवाद आहे. हे ध्रुवाच्या उदाहरणावरुन सिद्ध होतं. समर्थांचं उदाहरण त्याकरताच आहे. व्यवहार तेवढा प्रयत्नवाद आहे. व्यवहार सोडून भक्तीला लागणं निष्फळ आहे. प्रयत्न नाही कांही नाही. पण तोही मोठा प्रयत्नवाद आहे. व्यवहारातला प्रयत्न देहासक्तीने होतो म्हणून तो अपुरा होतो, अपुरा राहातो.

आपलंच मन आणखी निराश होतं आणि आपणच सोडून देतो. परमार्थ मार्ग मात्र तसा नाही.

८२. सज्जनांची सेवा –

सज्जनांची सेवा म्हणजे मोक्षाचे द्वार आहे आणि संसारातील विषयी लोकांची संगती करणं म्हणजे नरकाचा दरवाजा आहे. ती संगती तुम्ही करु नका. समचित्त, क्रोधरहीत चित्त असणारे जे खरे महात्मे आहेत त्यांच्या संगतीत आपला काल घालवा. त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे आपल्या मनाची परिवाराच्या ठिकाणी जी आसक्ती आहे ती कमी करा, ममता कमी करण्याचा प्रयत्न करा. देहादिकांविषयी उदासीन राहा. अनासक्त राहून कर्तव्य कर्म करा म्हणजे तुमचा उद्धार होईल.

८३. ज्ञानप्राप्ती –

ब्रह्मज्ञानी महात्म्यांच्या चरणांची धूळ अंगावर पडल्याशिवाय, म्हणजे इतकी नम्रता निरहंकार बुद्धी जोपर्यंत झाली नाही, त्यांची कृपा झाल्याशिवाय हे ज्ञान मिळणार नाही. इतर कोणत्याही साधनाने त्याची प्राप्ती होणार नाही. त्या धुलीकणांचा अभिषेक जेव्हां आपल्यावर होईल त्यावेळी आपल्या बुद्धीतले रजोगुण, तमोगुण बाजूला होतील आणि मग त्या बुद्धीला एक असं जे भगवत्स्वरुप आहे त्याचं ज्ञान होईल. ही एकत्व बुद्धी भगवान वासुदेवाच्या कृपेने प्राप्त होते. भगवान वासुदेवाबद्दल शुद्ध भावना जर

निर्माण झाली तर व्यवहार संपून जातो.

८४. दंभ –

आपल्या हातून झालेलं जे पुण्य आहे ते लोकांना सांगायची एक प्रवृत्ती असते. मी असं दान केले. अमक्या संस्थेला इतकी देणगी दिलेली आहे. मी इतक्या तीर्थयात्रा केल्या. मी वारीला जाऊन आलो. काय, सांगून काय करायचंय? सांगितलं म्हणजे पुण्य गेलं ना ! सांगायचच असेल तर माझ्या हातून काय पाप झालं ते सांगितलं पाहिजे. जर धैर्य असेल तर माझ्या हातून असा दोष झालेला आहे हे जर आपल्या तोंडाने सांगितले तर ते पाप जात. त्याचप्रमाणे मी अमुक पुण्यकर्म, दानधर्म केला असे उच्चारले की गेलं पुण्य. यालाच दंभ म्हणतात.

८५. पापक्षय कशाने होतो?

तत्त्वज्ञान झाले पाहिजे. ईश्वर साक्षात्कार झाला म्हणजे सर्व पापक्षय होतो. तो होण्याकरता केवळ अंत:करणामध्ये श्रद्धा, भक्ती आणि प्रेम दोघांचा समन्वय पाहिजे. सद्‌गुरुंच्या वचनावर श्रद्धा पाहिजे. पूर्ण विश्वास अंत:करणामध्ये उत्पन्न होणं व भगवत् प्रेम यामुळे अधिकाधिक वाढत जाणं याने सर्वही पातकांचा क्षय होतो.

८६. श्रद्धा कशी पाहिजे?

श्रीगुरुचरित्रातल्या कथेत दत्तप्रभु गाणगापूरमध्ये जिच्याकडे भिक्षेला गेले ती स्त्री मोठी साध्वी. महाराजांनी भिक्षेला

दूध देण्यास सांगितले. तिच्या घरात बांधलेली म्हैस जरी दूध देणारी नसली तरी महाराजांनी त्याच म्हशीचे दूध काढायला सांगितल्यावर तिच्या मनाने, बुद्धीने निर्णय केलेला आहे की महाराजांचा शब्द खरा आहे. हा विश्वास निर्माण होऊन ती दूध काढायला गेली व म्हशीने दूध दिलेले आहे. महात्म्यांच्या शब्दांवर अशी श्रद्धा पाहिजे.

८७. ईश्वराचे संरक्षण म्हणजे काय?

ईश्वर सर्व जीवांना उत्पन्न करतो आणि तोच संरक्षण करतो. संरक्षण करतो याचा अर्थ हा आहे. पाप दूर करणे हे मुख्य संरक्षण आहे. व्यावहारिक अनुकूलता निर्माण करणं म्हणजे संरक्षण नाहीये. तर बुद्धीमध्ये असणाऱ्या पापवासना हा मोठा दोष आहे तोच दूर झाला पाहिजे म्हणजे पापं दूर होतील. तो पापक्षय करणेचे सामर्थ्य भगवंताचेच आहे.

८८ अकिंचन म्हणजे काय?

अकिंचन म्हणजे धर्म, अर्थ, काम या तीनही पुरुषार्थाचे ज्याच्याजवळ कांहीही नाही.

८९. अधिकारी कोण?

द्वंद्वातीत अवस्था व सात्विक बुद्धी ज्याची आहे तोच अधिकारी.

९०. रामायण कां लिहीले?

अत्यंत शुद्ध बुद्धी ज्याची झाली आहे असा मार्गदर्शक नेता कसा असला पाहिजे, हे दाखवण्याकरता राम चरित्र लिहीले

आहे.

९१. रामायणाचे सार काय आहे?

अभिमानाने आणि अन्यायाने वागणारा जो आहे त्याला त्याचा सख्खा भाऊसुद्धा सोडून जातो. न्याय मार्गाने, योग्य मार्गाने स्वार्थ सोडून सर्व समाजाच्या कल्याणाकरता प्रयत्न करणारा जो राम त्याला पशु पक्षीसुद्धा सहाय्य करतात. हे रामायणाचे सार आहे.

९२. नामरुपात्मक विश्वाकडे कसे पहावे?

हे जर समजून घ्यायचे असेल तर संतांच्या संगतीत राहिले पाहिजे. संतांच्या ग्रंथातूनही पुष्कळ मार्गदर्शन मिळू शकते. संतांनी सांगितलेले विचार, त्यांच्या ग्रंथातून स्तोत्रातून मांडले आहेत. त्याचे चिंतन झाले पाहिजे. त्यामुळे चित्ताला समाधान मिळते.

९३. अर्थार्जन कशासाठी आहे?

केवळ आपल्या शरीराला भोग मिळावा, खाणे पिणे व्यवस्थित मिळावे किंवा वस्त्र, पात्र आणि सुखाची साधने मिळावीत या करिताच अर्थ नाही. त्या अर्थाबद्दलसुद्धा नारदांनी अद्वैत बुद्धी सांगितलेली आहे. जरी मला मिळालेले हे द्रव्य आहे तरी यामध्ये इतर सगळ्या मंडळींचेही नशिब आहे. त्यांच्या नशिबाचे सहाय्य आहे. त्यामुळे मिळाले आहे म्हणून त्यांच्याकरताही या द्रव्याचा उपयोग झाला पाहिजे. ही अद्वैत वृत्ती पाहिजे. माझा, माझ्या कुटुंबाचा,

माझ्या ग्रामस्थांचा, प्रांतीयांचा, राष्ट्राचा सर्व लोकांचाही यात भाग आहे.

९४. जगात कसे वागावे?

अखंड नामस्मरण करण्याचा प्रयत्न करावा. जीवनाकडे साक्षी भावाने पहावे. तुम्ही थिएटरमध्ये जाऊन सिनेमा पहाता. तो संपल्यावर बाहेर येता आणि जे पाहिले ते विसरुन जाता. तसे जीवनांत घडणाऱ्या गोष्टींकडे त्रयस्थाच्या भूमिकेतून पाहून त्या विसरुन जाऊन आपण नामस्मरण करावे.

९५. पुण्यकर्म कोणते?

स्वत:चे पुण्यकर्म विसरुन जाणे हे खरं पुण्यकर्म आहे.

९६. घर पवित्र केव्हां होते?

आपले अनुष्ठान, साधना, उपासना जर अखंड चालू असेल तर ते घर पवित्र होते.

९७. नामाचा अपराध कोणता?

नामस्मरण करणाऱ्या भक्ताला चांगले अनुभव येतात, चित्तवृत्ती सात्विक होते, दर्शने होतात. हे नामाचे वैभव दुर्जनांना सांगू नये.

९८. तितिक्षेचा अभ्यास कसा करावा?

तितिक्षा वाढीस भिक्षूगीताचा अभ्यास करावा. जगात आपल्याला कोणी दु:ख देत नाही. आपण आपल्या अज्ञानाने स्वत:ला दु:खी, कष्टी करत असतो हे पटले

पाहिजे.

९९. सुखी होण्याचे मुख्य साधन कोणते?

सुखी होण्याचे मुख्य साधन म्हणजे ईश्वरभक्ती होय.

१००. तीव्र भक्ती म्हणजे काय?

तीव्र भक्ती म्हणजे अनन्य भक्ती अंत:करणात उत्पन्न होऊन ते मन ईश्वराच्या ठिकाणी स्थिर होते.

**॥ अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ॥**